सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

## माहूर न्यायालयाजवळ कारचा भीषण अपघात;दोन भाविक थोडक्यात बचावले

माहूर/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र माहूर येथे दर्शनासाठी येत असलेल्या दोन भाविकांच्या कारचा माहूर न्यायालयाजवळ भीषण अपघात झाला. सुदैवाने कारमधील एअरबॅग वेळेत उघडल्याने दोन्ही भाविकांचा जीव वाचला. ही घटना शनिवारी (दि.४) दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास घडली.यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथील तुषार राठोड व गजानन राठोड हे स्विफ्ट कार (क्र.एमएच ५० एल २६२५) ने श्री रेणुकामाता गडावर दर्शनासाठी येत होते. दरम्यान, माहूर न्यायालय व श्री रेणुका देवी महाविद्यालया दरम्यान असलेल्या राष्ट्रीय महामार्गावरील धोकादायक वळणावर समोरून अचानक मोटारसायकल आल्याने तिला वाचविण्यासाठी चालकाने अचानक ब्रेक लावल्याने कार घसरली आणि रस्त्यालगत संरक्षक कठडा नसलेल्या ठिकाणाहून थेट न्यायालयाच्या भिंतीलगत असलेल्या खोल खड्ड्यात जाऊन उलटली.अपघातात कारचे मोठे नुकसान झाले.मात्र दोन्ही भाविक थोडक्यात बचावले.

•वर्ष २४ वे • अंक २५१ • शनिवार दि.४ जुलै २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

# मुंबईसह राज्यात मुसळधार पावसाचा इशारा

## अनेक जिल्ह्यांना रेड अलर्ट,शाळांना सुट्टी



मुंबई/प्रतिनिधी- जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून राज्यभरात पावसाचा जोर वाढलेला दिसून येत आहे. राज्यातील अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाच्या सरी कोसळत आहे. हवामान विभागाकडून पुढील काही दिवसांसाठी अलर्ट जारी केला आहे. याशिवाय नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. खासकरुन मुंबई, ठाणे, रायगड, पालघर अशा जिल्ह्यांसाठी हवामान खात्याने रेड अलर्ट जाहीर केला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मुंबईत सलग चौथ्या दिवशीही मुसळधार पावसाचा जोर कायम राहणार आहे. शहरातील अनेक भागांत अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सखल भागात पाणी साचल्याची स्थितीही निर्माण झाली आहे. यामुळे महापालिकेकडून आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन दल आणि अन्य यंत्रणांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी समुद्रकिनारे, सखल भाग आणि धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

रेड अलर्ट लक्षात घेता नवी मुंबई, ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली आणि पालघर येथील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. पालघर जिल्ह्यात सातत्याने मुसळधार पाऊस सुरू आहे. यामुळे नद्या-नाल्यांमधील पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. काही ठिकाणी महाविद्यालये आणि अंगणवाड्यांना देखील सुट्टी देण्यात आली आहे.

**विदर्भात ऑरेंज अलर्ट**

विदर्भातील गोंदिया, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. उर्वरित जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट देण्यात आला आहे. या ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जुलैच्या सुरुवातीलाच झालेल्या दमदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.चांगल्या पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे रुग्णालयात दाखल,प्रकृती स्थीर

मुंबई/प्रतिनिधी- राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे (शिंदे गट) सर्वेसर्वा एकनाथ शिंदे यांना ठाण्यातील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यांच्यावर सध्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या निगराणीखाली उपचार सुरु असून एकनाथ शिंदे यांची प्रकृती पूर्णपणे स्थिर आहे.



प्राथमिक माहितीनुसार, गेल्या काही दिवसांमध्ये कामाचा अतिताण आणि प्रचंड दगदग याचा परिणाम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रकृतीवर झाला आहे. यामुळे शुक्रवारी विधिमंडळाचे कामकाज सुरु असताना एकनाथ शिंदे यांना ताप आला होता. तसेच त्यांना प्रचंड अशक्तपणा जाणवत होता. काल ठाण्यातील गंगुबाई शिंदे सभागृहात दुपारच्या सुमारास धुळ्यातील ठाकरेंच्या शिवसेनेच्या उपनेत्या शुभांगी पाटील यांचा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडणार होता. मात्र, एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडल्याने सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले. यानंतर एकनाथ शिंदे हे तातडीने ठाण्यातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले. सध्या ते रुग्णालयातच असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या प्रकृतीबाबत कोणतीही विशेष काळजी करण्याचे कारण नाही, असे शिवसेनेतील सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

# आवश्यक असेल तरच घराबाहेर पडावे-मुख्यमंत्री

मुंबई/प्रतिनिधी-मुंबईसह राज्यातील अनेक भागांमध्ये सुरु असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना सावध राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्रशासनाकडून देण्यात येत असलेल्या अलर्टचे तंतोतंत पालन करा. कारण, पुढील दोन दिवसांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस आणि वादळं येण्याची शक्यता असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. ते शनिवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



ठाणे, रायगड, पालघर असेल पुण्याचा काही भाग, नाशिक याठिकाणी मुसळधार पाऊस आहे. कालपासून आपण वेगवेगळे अलर्ट दिले आहेत. या भागात सातत्याने ६ जुलैपर्यंत मुसळधार पाऊस असेल, वादळंही येतील. तसेच या भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. आपण दर तीन तासांनी आपण या भागातील नागरिकांना एसएमएस पाठवत आहोत. शाळांना सुट्टी दिली आहे. लोकांना विनंती केली आहे की, प्रवास टाळता आला तर टाळला पाहिजे, गरज असेल तरच घराबाहेर पडा. आता ज्याप्रकारे पाऊस आणि वादळ आहे काही अपघात होऊ नयेत म्हणून प्रशासनाकडून अलर्ट पाठवले जात आहेत. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ परिस्थितीवर नजर ठेवून आहेत. माझी लोकांना विनंती आहे की, आपण नीट अलर्ट देतोय, लोकांनी ते अलर्ट फॉलो करावेत, शक्यतो त्याप्रमाणे बाहेर पडावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.




(छाया : करणसिंह बैस)

देगलूर नाका येथील एमआयएमच्या पक्ष कार्यालयापासून एसआयआर अभियानाच्या जनजागृतीसाठी रिक्षांना प्रचार फलक व ध्वनीक्षेपक लावून प्रसिध्दी करण्यासाठी झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. यावेळी एमआयएमचे माजी प्रदेशाध्यक्ष सय्यद मोईन, फेरोज खान, महापालिकेचे विरोधी पक्षनेते मसुद खान, सय्यद मुजीब स.मुक्तार, लतीफ लोखंडवाला, सय्यद फसीयोद्दीन, मो.नासेर, रहीमखान यांच्यासह एमआयएमचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नांदेड जिल्हा बँकेकडून ११ हजार १६६ कर्जदारांचा तपशील पोर्टलवर अपलोड

नांदेड/प्रतिनिधी-राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणी अंतर्गत नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जिल्ह्यातील ११ हजार १६६ थकीत कर्जदार शेतकऱ्यांचा तपशील शासनाच्या ऑनलाइन कर्जमुक्ती पोर्टलवर अपलोड केला असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे यांनी दिली.

योजनेची प्रभावी, पारदर्शक आणि वेळेत अंमलबजावणी व्हावी, यासाठी जिल्हा मध्यवर्ती बँकेला पात्र कर्जदारांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार, शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार लेखापरीक्षकांनी तपासणी करून पात्र ठरविलेल्या ११,१६६ शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर नोंदविण्यात आली आहे.या पात्र शेतकऱ्यांवरील थकीत कर्जाची एकूण रक्कम ९५ कोटी ९२ लाख रुपये इतकी आहे.शासनाची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच त्यांचा आत्मविश्वास वाढवून शेतीला नवसंजीवनी देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण तसेच ग्रीस्टॅक नोंदणी वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# चौफाळा भागात एका तरुणावर प्राणघातक हल्ला

नांदेड/प्रतिनिधी- शहरातील चौफाळा भागात जुन्या वादातून एका तरुणावर प्राणघातक हल्ला करुन गंभीर जखमी केल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली आहे.

चौफाळा भागातील शनीदेव गल्लीत जुन्या वादातून दुर्गेश गुरुप्रसाद चंलिद्रवार (वय १९) रा.शनीदेव गल्ली याच्यावर शंकर किशन जिंदम उर्फ चंग्या व मारोती गुंडेवार या दोघांनी प्राणघातक हल्ला करुन गंभीर जखमी केले. जखमी दुर्गेश चंलिद्रवार याच्या गळ्याला गंभीर जखम झाली आहे. त्यास उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात शंकर किशन जिंदम उर्फ चंग्या, मारोती गुंडेवार यांच्या विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार गवळी हे करीत आहेत.

# नांदेड जिल्हा रेशीम हब बनविणार-जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यात रेशीम शेतीला मोठी चालना देण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी सहकार्य करणार असून, येत्या काळात नांदेड जिल्ह्याला रेशीम हब म्हणून विकसित करण्याचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्याल-याच्या नियोजन भवन येथे आयोजित रेशीम शेतकरी मेळावा व पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा रेशीम अधिकारी अशोक वडवळे, नायब तहसीलदार सुनंदा कराळे, कपिल सोनटक्के, आशिष राऊत, दिनेश खडसे, बालाजी केंद्रे, मनीषा टुले, मनोहर वडवळे, अमोल आजने, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शेतकरी रत्नकर ढगे, तसेच जिल्ह्यातील प्रगतशील रेशीम शेतकरी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले की, जिल्ह्यात अनेक प्रगतशील शेतकरी प्रेरणादायी पद्धतीने रेशीम शेती करत असून, एक हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी नव्याने रेशीम शेतीसाठी नोंदणी केली आहे. जिल्ह्याला रेशीम हब बनविण्याच्या दिशेने हा मेळावा म्हणजे सुरुवात ठरणार आहे.पारंपरिक पिकांच्या तुलनेत रेशीम शेती अधिक फायदेशीर व खात्रीशीर उत्पन्न देणारी असल्याचे सांगत त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून अभ्यासपूर्ण रेशीम शेती करण्याचे आवाहन केले. रेशीम शेतीतील अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालय आणि जिल्हा प्रशासन कायम **पान ४ वर**

## कै.सौ.कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर

# राजेंद्र दर्डा यांना जीवनगौरव,तर विजया रहाटकर यांना स्मृती पुरस्कार

## विजेत्यांमध्ये डॉ.बालाजी आसेगावकर, मंदार भारदे, दिव्या देशमुख यांचाही समावेश

नांदेड/प्रतिनिधी- मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात एक प्रतिष्ठित पुरस्कार म्हणून नावारूपास आलेले दैनिक सत्यप्रभाचे यंदाचे कै.सौ.कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर झाले आहेत. यावर्षी प्रथमच डॉ. शंकरराव चव्हाण जीवनगौरव पुरस्काराचा समावेश करण्यात आला असून, लोकमत समूहाचे एडिटर-इन-चिफ तथा माजी मंत्री राजेंद्र दर्डा त्याचे पहिले मानकरी ठरले आहेत. त्याचप्रमाणे महिला आयोगाच्या अध्यक्ष विजयाताई रहाटकर, छत्रपती संभाजीनगर येथील स्नेहसावलीचे संस्थापक डॉ. बालाजी आसेगावकर, विमान क्षेत्रात गगनभरारी घेणारे मॅब एव्हिएशनचे संस्थापक मंदार भारदे व महिला बुद्धिबळ विश्वविजेती



दिव्या देशमुख यांना कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर झाले आहेत.

दैनिक सत्यप्रभाचे कार्यकारी संपादक संतोष पांडागळे यांनी आज या पुरस्कारांची घोषणा केली. यंदाच्या पुरस्काराचे मानकरी निश्चित करण्यासाठी दैनिक सत्यप्रभाचे मार्गदर्शक माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करण्यात आली होती. या समितीत नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चास्कर, प्रख्यात वैद्यकतज्ज्ञ डॉ. नंदकुमार मुलमुले, वरिष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी व राजेश निस्ताने आणि उद्योजक सुमित मोरगे यांचाही समावेश होता. माजी केंद्रीय गृहमंत्री तथा माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रात उठावदार कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना मागील २२ वर्षांपासून या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते. कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कारांच्या यापूर्वी मानकऱ्यांमध्ये अभिनेते जॅकी श्रॉफ, साहित्यिक फ. मु. शिंदे, रामायणाचार्य हभप रामराव महाराज ढोक, डॉ. तात्यासाहेब लहाने, श्रीमती कुसुमताई रसाळ,**पान ४ वर**

## नांदेडकरांना सूर्यदर्शन नाही

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहर व परिसरात शुक्रवारी रात्री पासूनच पावसाच्या सरी सुरु आहेत. आज सकाळपासूनच नांदेडकरांना सूर्यदर्शन झाले नाही.

आज (शनिवार) सकाळपासूनच आकाशात पावसाचे ढग जमा झाले होते. रिमझिम पावसाने हजेरी लावली. गेल्या दोन दिवसांपासून पाऊस पडत असल्याने जनजीवन विस्कळीत होत आहे. पावसामुळे अनेक रस्त्यांवरील खड्डयात पाणी साचले आहे. तर काही रस्ते चिखलमय झाले असून त्याचा त्रास वाहन चालकांना व नागरिकांना सहन करावा लागत आहे.

# घोषणांवर गुन्हे, घोडेबाजारावर मौन?

**लोकशाहीची खरी ताकद सत्तेत नसते, तर सत्तेला प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांच्या अधिकारात असते. आंदोलने, निदर्शने, घोषणाबाजी आणि सरकारच्या निर्णयांवर टीका करणे हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे. मात्र, जर विरोधी आवाजाला गुन्हेगारीचे स्वरूप दिले जाऊ लागले आणि त्याचवेळी सत्तेच्या राजकारणातील अनैतिक व्यवहारांकडे दुर्लक्ष केले गेले, तर लोकशाहीचा आत्माच धोक्यात येतो. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जमादार यांनी नुकत्याच एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान केलेले निरीक्षण याच वास्तवावर अचूक बोट ठेवणारे आहे. एसडीपीआयचे नेते अब्दुल वहीद चौधरी यांनी केंद्र सरकारच्या विविध निर्णयांविरोधात आंदोलने आयोजित केल्याच्या कारणावरून मुंबई पोलिसांनी त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल केले आणि त्यांना एक वर्षासाठी तडीपार करण्याचा आदेश दिला होता. या आदेशाविरोधातील सुनावणीदरम्यान न्यायालयाने केवळ त्या प्रकरणाचा विचार केला नाही, तर लोकशाहीच्या व्यापक मूल्यांवर भाष्य केले. ''महाराष्ट्रात घोडेबाजार सुरू आहे, तुम्ही बाजू बदला,'' अशी उपरोधिक टिप्पणी करत न्यायमूर्ती जमादार यांनी सध्याच्या राजकीय वास्तवावर भाष्य केले. त्याचबरोबर, ''दहा वर्षांच्या मुलाचा अपघातात मृत्यू झाला,पण विधानसभेत चर्चा मात्र अध्यक्षपदाच्या निवडीवर आणि पक्षांतरावर सुरू होती,'' हे निरीक्षण सत्ताधाऱ्यांच्या प्राधान्यक्रमावर कठोर प्रश्न उपस्थित करणारे आहे. हे निरीक्षण कोणत्याही एका पक्षावर टीका नसून संपूर्ण राजकीय व्यवस्थेच्या संवेदनशून्यतेवर केलेले भाष्य आहे. जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न बाजूला पडतात आणि सत्तेच्या गणिताला महत्त्व दिले जाते, ही आजच्या राजकारणाची शोकांतिका बनली आहे. बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, शिक्षण, आरोग्य आणि कायदा-सुव्यवस्था यावर चर्चा होण्याऐवजी आमदार कोणत्या पक्षात जाणार, कोणाचे सरकार टिकणार आणि कोणाला मंत्रीपद मिळणार यावर राजकारण केंद्रित झाले आहे.लोकशाहीत आंदोलन हा गुन्हा नसतो; उलट तो संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग आहे. अर्थात, आंदोलन शांततापूर्ण असावे आणि सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा पोहोचवणारे नसावे. परंतु केवळ सरकारविरोधी घोषणा दिल्या म्हणून नागरिकांना किंवा कार्यकर्त्यांना गुन्हेगार ठरवण्याची प्रवृत्ती धोकादायक आहे. सरकारवर टीका करणे म्हणजे राष्ट्रद्रोह नव्हे आणि सत्तेला प्रश्न विचारणे म्हणजे कायद्याचा भंग नव्हे. लोकशाहीत विरोधी मतांना स्थान नसेल, तर ती लोकशाही केवळ नावापुरती उरते. याचवेळी दुसरीकडे सत्तेसाठी होणारी पक्षांतरे, आमदारांची फोडाफोड, आर्थिक प्रलोभनांचे आरोप आणि तथाकथित घोडेबाजार याबाबत मात्र प्रशासन आणि तपास यंत्रणांची भूमिका अनेकदा मवाळ दिसते. आंदोलने करणाऱ्यांवर तत्पर कारवाई आणि सत्तेच्या राजकारणातील गंभीर आरोपांवर मात्र शांतता, हा विरोधाभास जनतेच्या मनात संशय निर्माण करतो. कायद्याचा वापर समान निकषांवर झाला पाहिजे; अन्यथा न्यायव्यवस्थेवरील आणि प्रशासनावरील विश्वास कमी होतो. न्यायालयाच्या निरीक्षणातून सरकारने आणि प्रशासनाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. विरोधी मत दडपून लोकशाही मजबूत होत नाही; उलट ती कमकुवत होते. लोकांचा आवाज ऐकण्याची क्षमता, टीका स्वीकारण्याची मानसिकता आणि जनहिताच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची राजकीय इच्छाशक्ती हेच लोकशाहीचे खरे बळ आहे.महाराष्ट्राला पुरोगामी विचारांची समृद्ध परंपरा लाभली आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रश्न विचारणारा, अन्यायाविरुद्ध उभा राहणारा समाज घडवला. त्या परंपरेत आंदोलनाला स्थान आहे; दडपशाहीला नाही. त्यामुळे सरकार कोणाचेही असो, विरोधकांवर गुन्ह्यांचा मारा आणि सत्तेतील अनैतिक व्यवहारांवर मौन ही भूमिका लोकशाहीस घातकच ठरणार आहे.न्यायमूर्ती माधव जमादार यांचे निरीक्षण हे केवळ न्यायालयीन टिप्पणी नाही; तो लोकशाहीच्या आरशात दिसणारा वास्तवाचा चेहरा आहे. हा आरसा फोडण्यापेक्षा त्यात दिसणारे विदारक चित्र बदलण्याची जबाबदारी सत्ताधारी, प्रशासन आणि संपूर्ण राजकीय व्यवस्थेची आहे. अन्यथा घोषणांवर गुन्हे दाखल होतील,पण लोकशाहीचा खरा गुन्हेगार मात्र मोकाटच राहील.**

# हिंदूंचे श्रद्धास्थान राम मंदिर आणि धार्मिक संस्थांमधील पारदर्शकतेची गरज




अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिर हे कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचे, आस्थेचे आणि सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक आहे. अनेक शतकांपासून प्रलंबित असलेल्या या विषयाचा निकाल न्यायालयाने दिल्यानंतर संपूर्ण देशात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर केंद्र सरकार, श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट, विविध हिंदू संघटना, असंख्य संत-महंत आणि देशभरातील लाखो-कोट्यवधी रामभक्त यांच्या प्रयत्नातून भव्य राम मंदिराचे स्वप्न साकार झाले. भूमिपूजनापासून मंदिराच्या उभारणीपर्यंत अनेकांनी आपापल्या परीने योगदान दिले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या ऐतिहासिक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे हे मंदिर केवळ धार्मिक वास्तू नसून देशाच्या सांस्कृतिक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरले आहे.

अशा पवित्र आणि श्रद्धेच्या केंद्राशी संबंधित कोणतीही नकारात्मक बातमी समोर आली की, देशभरातील भाविकांच्या भावना स्वाभाविकपणे दुखावल्या जातात. अलीकडील काळात राम मंदिराशी संबंधित आर्थिक व्यवहारांबाबत काही कथित आरोप आणि चर्चांना सार्वजनिक स्तरावर वाव मिळाला. या आरोपांची सत्यता सक्षम चौकशीतूनच स्पष्ट होऊ शकते. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला दोषी ठरविण्यापूर्वी निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी होणे हीच लोकशाहीची आणि न्यायव्यवस्थेची अपेक्षा आहे.देशभरातील लाखो रामभक्तांनी मंदिरासाठी आर्थिक मदत केली. अनेक गावांमध्ये विटापूजन, जलपूजन, निधी समर्पण अभियान आणि विविध धार्मिक उपक्रम राबविण्यात आले. अनेक कुटुंबांनी आपल्या आर्थिक परिस्थितीची पर्वा न करता श्रद्धेने देणगी अर्पण केली. या देणग्या केवळ पैशाच्या स्वरूपातील नव्हत्या; त्या भाविकांच्या श्रद्धा, विश्वास आणि प्रभू श्रीरामावरील प्रेमाचे प्रतीक होत्या. त्यामुळे या निधीचा प्रत्येक रुपया योग्य प्रकारे वापरला गेला आहे, याबाबत समाजात पूर्ण विश्वास निर्माण होणे आवश्यक आहे.

पारदर्शकता ही कोणत्याही धार्मिक संस्थेची सर्वात मोठी ताकद असते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येक मोठ्या धार्मिक संस्थेने वार्षिक आर्थिक अहवाल, देणगीचा तपशील, खर्चाचे विवरण, लेखापरीक्षण अहवाल आणि विकासकामांची माहिती सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध करून दिल्यास अनेक शंका आपोआप दूर होऊ शकतात. पारदर्शकतेमुळे श्रद्धा अधिक दृढ होते, तर गुप्ततेमुळे अनावश्यक संशय निर्माण होतो.राम मंदिरापुरता हा विषय मर्यादित नाही. देशभरात हजारो मंदिरे, मठ, आश्रम, धर्मशाळा, दर्गे, गुरुद्वारे, चर्च आणि इतर धार्मिक संस्था कार्यरत आहेत. अनेक ठिकाणी इनामी जमिनी, दानातून मिळालेली मालमत्ता आणि विविध प्रकारच्या धार्मिक संपत्तीचे व्यवस्थापन केले जाते. अशा सर्व धार्मिक संस्थांच्या आर्थिक आणि प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता असणे आवश्यक आहे. हा विषय कोणत्याही एका धर्मापुरता मर्यादित नसून सर्व धार्मिक संस्थांसाठी समान निकष असावेत. महाराष्ट्रात अनेक प्राचीन हेमाडपंथी मंदिरे आजही अस्तित्वात आहेत. या मंदिरांना ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि पुरातत्त्वीय महत्त्व आहे. दुर्दैवाने अनेक मंदिरे जीर्णावस्थेत असून तेथे नियमित पूजा-अर्चा होत नाही. काही ठिकाणी दिवाबत्तीचीही व्यवस्था नसते. मंदिर परिसर अस्वच्छ असतो. अशा परिस्थितीत या मंदिरांचे व्यवस्थापन कोणाकडे आहे, इनामी जमीन असल्यास तिचा उपयोग कसा केला जातो, मंदिराच्या उत्पन्नाचा वापर संवर्धनासाठी होतो का, असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.काही गावांमध्ये सरकारी किंवा सार्वजनिक जागेवर वर्षानुवर्षे परवानगीशिवाय धार्मिक बांधकामे उभारली गेल्याच्या तक्रारी वेळोवेळी समोर येतात. हा विषय अत्यंत संवेदनशील असल्याने प्रशासनाने कायद्याच्या चौकटीत राहून, सर्व धर्मांना समान न्याय देत निर्णय घेणे आवश्यक आहे. श्रद्धेच्या नावाखाली कोणताही बेकायदेशीर प्रकार घडू नये, हीच जनतेची अपेक्षा आहे.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

सण-उत्सवांच्या काळात अनेक मंडळे आणि समित्यांकडून देणग्या गोळा केल्या जातात. बहुसंख्य मंडळे प्रामाणिकपणे काम करतात; मात्र काही ठिकाणी पावती न देता निधी गोळा केल्याच्या तक्रारी अधूनमधून समोर येतात. अशा प्रकारांमुळे समाजातील विश्वास कमी होतो. त्यामुळे देणगी संकलनासाठी अधिकृत पावती, डिजिटल व्यवहार आणि वार्षिक हिशेब सार्वजनिक करणे आवश्यक आहे.धर्मादाय आयुक्त कार्यालयाची जबाबदारी येथे अत्यंत महत्त्वाची ठरते. नोंदणीकृत सार्वजनिक न्यासांचे नियमित लेखापरीक्षण, आर्थिक व्यवहारांची तपासणी, मालमत्तेची पडताळणी आणि आवश्यकतेनुसार चौकशी केली गेल्यास गैरव्यवहारांना आळा बसू शकतो. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व धार्मिक संस्थांची माहिती ऑनलाइन उपलब्ध करून दिल्यास पारदर्शकता अधिक वाढेल.

इनामी जमिनींचा प्रश्नही गांभीर्याने हाताळण्याची गरज आहे. अनेक धार्मिक संस्थांकडे पूर्वीपासून इनामी किंवा दान स्वरूपात मिळालेल्या जमिनी आहेत. त्या जमिनींची सध्याची स्थिती काय आहे, त्यांचा वापर कोण करतो, त्यातून मिळणारे उत्पन्न मंदिर किंवा धार्मिक संस्थेच्या विकासासाठी खर्च होते का, याची नियमित पडताळणी आवश्यक आहे. जर एखाद्या संस्थेकडे मोठी संपत्ती असूनही मंदिर जीर्णावस्थेत असेल, तर त्यामागील कारणांचा शोध घेणे आवश्यक ठरते. ग्रामीण भागात अनेक लहान देवस्थाने आहेत. काही ठिकाणी ग्रामस्थ स्वतःच्या योगदानातून पूजा-अर्चा करतात, तर काही ठिकाणी मंदिरांची देखभाल करण्यासाठी निश्चित व्यवस्था नसते. अशा मंदिरांच्या संवर्धनासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, पुरातत्त्व विभाग, धर्मादाय आयुक्त कार्यालय आणि समाज यांनी संयुक्तपणे पुढाकार घेण्याची गरज आहे.

श्रद्धा ही भारतीय समाजजीवनाची मोठी शक्ती आहे. श्रद्धेचा आधार घेऊन समाजसेवा, शिक्षण, आरोग्य, अन्नदान आणि संस्कार यांसारखी अनेक चांगली कामे देशभरातील धार्मिक संस्था करत आहेत. त्यामुळे काही अपवादात्मक घटनांमुळे सर्व संस्थांकडे संशयाने पाहणे योग्य नाही. त्याच वेळी, जिथे गैरव्यवहाराचे आरोप होतात तिथे निष्पक्ष चौकशी होणेही तितकेच आवश्यक आहे. दोषी कोणीही असो, कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे; आणि आरोप निराधार असल्यास संबंधित संस्थेची प्रतिमाही स्पष्टपणे उभी राहिली पाहिजे.समाजातील प्रत्येक भाविकाची अपेक्षा एकच आहेदेवाच्या नावाने जमा झालेला प्रत्येक रुपया देवकार्य, धर्मकार्य, समाजहित आणि मंदिरांच्या विकासासाठीच खर्च झाला पाहिजे. श्रद्धेचा गैरवापर करणाऱ्यांना कायद्याचा धाक असला पाहिजे, तर प्रामाणिकपणे काम करणाऱ्या संस्थांचा सन्मानही झाला पाहिजे.

केंद्र सरकार, राज्य सरकार, धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुरातत्त्व विभाग, स्थानिक प्रशासन आणि धार्मिक संस्थांचे विश्वस्त यांनी समन्वयाने काम केल्यास देशातील धार्मिक संस्थांच्या व्यवस्थापनात अधिक पारदर्शकता आणता येईल. सर्व धार्मिक स्थळांचे नियमित लेखापरीक्षण, मालमत्तेची डिजिटल नोंद, देणग्यांचा ऑनलाइन हिशेब आणि वार्षिक अहवाल अनिवार्य केल्यास श्रद्धाळू नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल. राम मंदिर हे संपूर्ण देशाच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. त्यामुळे त्याच्याशी संबंधित प्रत्येक बाब अत्यंत पारदर्शक, जबाबदार आणि कायदेशीर असणे आवश्यक आहे. श्रद्धेचा पाया विश्वासावर उभा असतो आणि विश्वासाचा पाया पारदर्शकतेवर. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे आरोप समोर आल्यास त्यांची निष्पक्ष चौकशी होणे, सत्य जनतेसमोर येणे आणि आवश्यक ती कारवाई होणे हेच लोकशाही, न्यायव्यवस्था आणि धर्म या तिन्हींच्या हिताचे आहे.

आज गरज आहे ती आरोप-प्रत्यारोपांची नव्हे, तर सत्य, पारदर्शकता आणि जबाबदारीची. श्रद्धेचे रक्षण केवळ भावनेने होत नाही; ते प्रामाणिक व्यवस्थापन, कायद्याचे पालन आणि समाजाच्या विश्वासाचे जतन यांमुळे होते. प्रत्येक धार्मिक संस्थेने या मूल्यांचा स्वीकार केला, तर भविष्यात अशा वादांना स्थान राहणार नाही आणि श्रद्धा अधिक दृढ होईल. हाच खरा सनातन संस्कृतीचा संदेश आहे.

# डम्पिंग ग्राउंडचे 'ऑक्सिजन झोन'मध्ये रुपांतर;किनवटमध्ये ९ हजार वृक्ष लागवडीला प्रारंभ

किनवट/प्रतिनिधी-'एक पेड माँ के नाम'वृक्ष लागवड मोहीमे अंतर्गत आणि अमृत वृक्ष आपल्या दारी, योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने किनवट नगरपरिषदेच्या डम्पिंग ग्राउंड परिसरात ३ जुलै रोजी वृक्षारोपणाचे श्रीफळ फोडले. १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत वृक्षारोपणाची लक्षपुर्ती करण्यात येणार आहे. अटल आनंद घनवन २०२६ योजनांतर्गत ९ हजार वृक्ष लागवड करणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

अटल आनंद घनवन योजना २०२६ अंतर्गत 'हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र' शासनाच्या या निर्णयान्वये सामाजिक वनीकरण विभाग नांदेड, परिक्षेत्र किनवटच्या वतीने किनवट नगरपरिषदेच्या डम्पिंग ग्राउंड परिसरात स्व.वसंतराव नाईकांच्या जयंतीचे औचित्य साधून ३ जुलै रोजी नगराध्यक्षा सौ.सुजाताताई एंड्रूलवार यांच्या हस्ते वृक्ष लाऊन, ३० आर क्षेत्रात ९ हजार वृक्षांची लागवड करून घनवन क्षेत्र विकसित करण्याच्या उपक्रमाची सुरुवात केली आहे.उपनगराध्यक्ष पठाण मोहम्मद हसन खान, रोहन एंड्रूलवार, नगरसेवक अभय महाजन, शिवसेना (उबाठा) शहर प्रमुख तथा नगरसेवक प्रशांत कोरडे, बांधकाम सभापती श्रीराम नेम्मानिवार, पाणीपुरवठा सभापती निसार भाटी, नगरसेवक चंद्रशेखर नेम्मानिवार, प्रभू कोल्हे, किरण कलगोटवार, दत्ता कोल्हे, वनपरिक्षेत्र अधिकारी एस.एच. संघई, वनपाल प्रकाश सूर्यवंशी, वनरक्षक सुनील खामकर, सारिका माहुरे, श्रीमती गीते, नगरपरिषदेचे कर्मचारी, नागरिक,कार्यकर्ते उपस्थित होते.

**डम्पिंग ग्राउंडचे रुपांतर घनवनात करून शहराला ऑक्सिजन झोन देण्याचा हा प्रयत्न-सौ.एंड्रूलवार**

स्व.वसंतराव नाईकांनी पर्यावरण अबाधित राखण्यासाठी हरित क्रांतीचे दिलेले योगदान अविस्मरणीय आहे. त्यांच्या जयंतीच्या औचित्यावर वृक्षारोपणाची केलेली सुरुवात किनवटच्या पर्यावरण समतोलासाठी महत्त्वाची ठरणार आहे. यापुढे डम्पिंग ग्राउंडचे रूपांतर घनवनात करून शहराला



ऑक्सिजन झोन मिळवून देण्याचा हा एक प्रयत्न असल्याचे नगराध्यक्षा सौ. एंड्रूलवारांनी मतप्रदर्शित केले.

**वृक्षारोपणानंतर संगोपन, संवर्धन आणि संरक्षण कोणाकडे ?**

किनवट नगरपरिषदेच्या हद्दीत ९ हजार वृक्ष लागवड करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने ३ जुलै रोजी किनवट नगर-परिषदेच्या डम्पिंग ग्राउंडमध्ये केलेल्या वृक्षारोपणानंतर कळविले. यदाकदाचित ती वृक्ष लागवड झालीच तर त्या वृक्षांचे संगोपन, संवर्धन आणि संरक्षणाची नेमकी जबाबदारी सामाजिक वनीकरण विभागाची की नगरपरिषदेची? याबद्दलची स्पष्टता समोर आलेली नाही.

अशी प्रसिद्धीच्या झोतात येणारी वरपांगी वृक्षारोपणे तर नेहमीच पहायला मिळतात. आजपर्यंतच्या किनवटच्या इतिहासातील वृक्ष लागवड आणि त्यातील निष्पत्तीची आकडेवारी शुन्यांशावर दिसते. वडाची, पिंपळाची अशी ऑक्सिजन देणारी किनवट शहरात वृक्ष लागवड झाली पाहिजे तरच ऑक्सिजन झोनची स्वप्नपूर्ती होईल अशा नागरिकांच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळताहेत.

# बैलगाडीतून प्रभातफेरी:दिंडाळ्यात रंगला प्रवेशोत्सवाचा सोहळा

उमरखेड/प्रतिनिधी- उमरखेड तालुक्यातील दिंडाळा येथील जिल्हा परिषद शाळेत गटशिक्षण अधिकारी बेटेवाड यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांची बैलगाडीतून प्रभातफेरी काढण्यात आली.



नारळीच्या फांद्या व फुग्यांनी सजवलेल्या बैलगाडीतून पारंपरिक हळगीच्या गजरात ही मिरवणूक लक्षवेधी ठरली. यावेळी शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर आकर्षक रांगोळ्या व विविध सजावट करण्यात आली होती. नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व चॉकलेट देऊन हर्षोल्हासात स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात सरपंच कैलास राठोड, उपसरपंच गजानन जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल राठोड, भागोराव जाधव व इतर शिक्षकांनी विद्यार्थी व शाळेच्या उज्ज्वल प्रगतीबाबत मनोगत व्यक्त केले. यावेळी गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# जन्म-मृत्यू नोंदीतील प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढा

## एकनाथ पा.जाधव यांनी अधिकाऱ्यांना विचारला जाब

हदगांव/प्रतिनिधी-हदगाव तालुक्यात जन्म व मृत्यू नोंदीसंदर्भात नागरिकांकडून सातत्याने येणाऱ्या तक्रारींची गंभीर दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष व उद्योजक एकनाथ पाटील जाधव यांनी तहसील कार्यालयाला भेट देत संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी जन्म व मृत्यू नोंदीची अनेक प्रकरणे प्रलंबित का आहेत, याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारत नागरिकांची गैरसोय तातडीने दूर करण्याची मागणी केली.

जन्म व मृत्यू नोंदी ही नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची प्रशासकीय सेवा असून, शैक्षणिक प्रवेश, शासकीय योजना, वारसा हक्क, बँकिंग व्यवहार तसेच विविध कागदपत्रांसाठी या दाखल्यांची आवश्यकता असते. मात्र, नोंदी वेळेत होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना तहसील कार्यालयाचे वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याच्या तक्रारी वाढत असल्याचे जाधव यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी त्यांनी प्रशासनाने नागरिकांना वेळेत आणि पारदर्शक सेवा देणे ही त्यांची जबाबदारी असल्याचे स्पष्ट करत, प्रलंबित सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली. नागरिकांना अनावश्यक विलंब व मनस्ताप सहन करावा लागू नये, यासाठी संबंधित विभागाने कार्यपद्धतीत सुधारणा करून प्रकरणांचा जलद निपटारा करावा, असेही त्यांनी सांगितले. तसेच, जन्म व मृत्यू नोंदीची प्रकरणे त्वरित मार्गी न लावल्यास नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही उद्योजक एकनाथ पाटील जाधव यांनी प्रशासनाला दिला. दरम्यान, या प्रश्नावर प्रशासन कोणती ठोस भूमिका घेते आणि प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे हदगाव तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

> गेल्या सहा महिन्यात केवळ बारा प्रकरणी निकाली काढण्यात आली असून याबाबत आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे एकूण तहसील कार्यालयामध्ये ६०० प्रकरणे प्रलंबीत असालयाची माहीती असून संबंधित विभागाचे कर्मचारी टेबल्सवरून दिसून येत नसल्याने परिणाम स्वरूप ही कामे प्रलंबीत असाल्याच दिसून येत आहे.

# जैन विद्यार्थ्यांसाठी राज्यात सात ठिकाणी वसतिगृह उभारणार:ललित गांधी

मुंबई/प्रतिनिधी-जैन समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी राज्यात मुंबई, पुणे, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, छ. संभाजीनगर, कोल्हापूर एकूण सात ठिकाणी वसतिगृह उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाच्या संचालक मंडळाच्या चौथ्या बैठकीत घेण्यात आला. ही बैठक महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली.

यावेळी महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज व व्याज परतावा योजनांच्या सुधारित प्रारूपास मान्यता देण्यात आली. तसेच 'विहारधाम निर्माण योजना' आणि 'पाठशाळा आधुनिकीकरण व सक्षमीकरण योजना' राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व या संदर्भात राज्यभराचे सर्वेक्षण त्वरित पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला.राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळकडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या वसतिगृह उभारणीसंदर्भात प्राप्त मागण्यांवर चर्चा करून राज्यात मुंबई, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, छ. संभाजीनगर, कोल्हापूर या सात ठिकाणी विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.याशिवाय, 'मराठी जैन साहित्य विश्वकोष' निर्मितीसाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीसाठी सचिव माधवी खोडे-चवरे, व्यवस्थापकीय संचालक मेघना शिंदे, महिला बालविकास अधिकारी गौरी दोंदे, वित्त विभागाच्या अधिकारी रचना दरेकर, कौशल्य विकास विभागाचे आनंद माळी, समन्वयक संदीप भंडारी, महामंडळाचे सदस्य रावसाहेब पाटील, सुनील पाटणी तसेच विकास अच्छा, अमित जैन, दर्शना जैन, विश्वजीत कोल्हापुरे, प्रशांत गौडाजे आदी मान्यवर उपस्थित होते.

# भोकर तालुक्यात १४१.५० मिलिमीटर पावसाची नोंद

## आर्द्रा नक्षत्राच्या समाधानकारक पावसाने पेरण्यांना गती

भोकर/प्रतिनिधी-अर्द्रा नक्षत्रात झालेल्या समाधानकारक पावसाने तालुक्यात खरिपाच्या पेरण्यांना गती आली असून तालुक्यात एकूण १४१.५० मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे.

चालू वर्षाच्या खरीप हंगामात उशिरा पाऊस सुरू झाला मृग नक्षत्रात पाऊस पडलाच नाही संपूर्ण आरद्रा नक्षत्र कोरडेच गेले. मृग नक्षत्रात देखील उन्हाची तीव्रता वाढलेलीच होती मोठ्या प्रमाणावर उन्हाचे चटके लागत होते प्रचंड प्रमाणात उकाडा वाढल्याने नागरिकत्व झाले होते. पाऊस केव्हा पडेल याचीच प्रतीक्षा सर्व लोकांना लागलेली होती, अखेर २२ जून रोजी आर्द्रा नक्षत्रात पावसाने सुरुवात केली पंधरा दिवसाच्या विलंबानंतर पाऊस झाला रखडलेल्या खरिपाच्या पेरण्यांना सुरुवात झाली. भोकर तालुक्यात आद्रा नक्षत्राच्या प्रारंभीच पावसाने सुरुवात केली. खोळमलेल्या पेरण्यांना सुरुवात झाली २जुलै नंतर तालुक्यात १४१.५० मिलिमीटर पावसाची नोंद झाली भोकर मंडळात २०५.५० मिलिमीटर, किनी मंडळात १४०.९० मिलिमीटर, मोघाळी १२७.६० मिलिमीटर, मातुळ ९१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. आठवडाभर सारखाच पाऊस सुरू असल्याने उर्वरित संपूर्ण पेरण्या उरकल्या, कापूस, सोयाबीन, हळद, तुर, उडीद, मूग, ज्वारी अशा सर्वच पेरण्या सुरू झाल्या आहेत. आरद्रा नक्षत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने तालुक्यात सर्वत्र पेरण्या सुरू झाल्या आहेत.

# मतदारांनी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत;नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचे आवाहन

## विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण मोहिम



माहूर/प्रतिनिधी-भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू झालेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेअंतर्गत प्रशासनाने घराघरांत जाऊन मतदारांची माहिती अद्ययावत करण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक मतदाराने आवश्यक कागदपत्रे तयार ठेवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी केले आहे.

३० जून २०२६ पासून राज्यभर सुरू झालेल्या या विशेष मोहिमेत मतदारांची माहिती पडताळून अद्ययावत केली जात आहे. कोणताही पात्र मतदार या प्रक्रियेपासून वंचित राहू नये, यासाठी नागरिकांनी स्वतःसह कुटुंबीय, नातेवाईक आणि परिसरातील इतर मतदारांनाही याबाबत जागरूक करावे, असेही त्यांनी सांगितले. एसआयआर फॉर्म भरण्यासाठी आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, रंगीत पासपोर्ट आकाराचे दोन फोटो, स्वतःचा मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी (असल्यास) ही कागदपत्रे आवश्यक आहेत. विशेषतः पासपोर्ट आकाराचे रंगीत फोटो आधीच तयार ठेवावेत, कारण ते अर्जासोबत जोडावे लागणार आहेत, अशी माहिती देण्यात आली. माहूर शहरातील १७ प्रभागांसाठी कार्यरत बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) यांना सहाय्य करण्यासाठी नगर पंचायत कडून तात्पुरत्या सहाय्यकांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे सहाय्यक फॉर्मचे वाटप, फॉर्म संकलन तसेच बीएलओ यांच्यासोबत प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन मतदार पडताळणीची कामे पार पाडणार असल्याची माहिती मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी दिली आहे. मतदार यादी अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत ठेवण्यासाठी सर्व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे आणि एसआयआर मोहिमेबाबत अधिकाधिक जनजागृती करावी, असे आवाहन नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी केले.

# देगलूर तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामांचा बट्ट्याबोळ

देगलूर/प्रतिनिधी-मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत २०१९ मध्ये मंजूर झालेल्या मौजे लख्खा येथील रस्त्याचे काम गेल्या सहा वर्षांपासून अर्धवट अवस्थेत पडून असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. निकृष्ट दर्जाचे काम करून कंत्राटदाराने रस्ता वाऱ्यावर सोडल्याने पावसाळ्यात मोठा अपघात होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

१९८३ च्या महापुरात पुनर्वसन झालेल्या लख्खा गावासाठी २०१९ मध्ये हा रस्ता मंजूर झाला होता. २०१९ च्या पोटनिवडणुकीवेळी तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त श्रीकांत देशपांडे देगलूर दौऱ्यावर आले असता, ग्रामस्थांनी निवडणूक बहिष्काराचा इशारा दिल्यानंतर त्यांनी रस्ता तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले होते. मात्र सहा वर्ष उलटूनही रस्त्याचे काम पूर्ण झालेले नाही. सामाजिक कार्यकर्ते संजय मंगरुळे यांनी १७ सप्टेंबर २०२५ रोजी ग्रामस्थांसह कार्यालयासमोर आमरण उपोषण केले. त्यानंतर कंत्राटदार एस. सी. शेंडगे यांनी कामाला सुरुवात केली. परंतु अर्धवट काम करून ते पुन्हा काम सोडून गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे, कंत्राटदाराने गावातील पंचांसमक्ष ५०० रुपयांच्या बॉण्डवर लेखी हमीपत्र देऊनही तसेच उपजिल्हाधिकारी कार्यालयात इन कॅमेरा लेखी आश्वासन देऊनही काम पूर्ण केलेले नाही. त्यामुळे उप-जिल्हाधिकाऱ्यांनाही जुमानत नाही का?, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकरणी पुणे येथील गुणवत्ता नियंत्रण पथकाने नुकतीच रस्त्याची तपासणी केली. तपासणी अधिकारी डब्लू. पी. भावे यांनी कामाच्या दर्जाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. पुलाच्या ठिकाणी सिमेंट पाईप टाकणे, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी साईट भरण करणे व रोड फर्निचर करण्याचे स्पष्ट आदेश त्यांनी उपअभियंता सुहास महामुनी व अर्जुन बोरगावकर यांना दिले. शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख हनुमंत राजुरे व सामाजिक कार्यकर्ते संजय मंगरुळे यांच्या मते, झालेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून ते मानकांप्रमाणे नाही. उप कार्यकारी अभियंता सुहास महामुनी यांच्याकडे वारंवार तक्रार करूनही दखल घेतली जात नसल्याने अधिकारी व कंत्राटदार यांच्यात हातमिळवणी असल्याची शंका ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

# मराठवाडा लोकविकासचा उद्या कार्यक्रम

नांदेड/प्रतिनिधी-नागरी समस्या व जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या मराठवाडा लोकविकास समन्वय संघर्ष समितीच्या वतीने दि.५ जुलै रोजी समिती सदस्यांना ओळखपत्र वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. सायं.४ वा. डॉ. वैद्य हॉस्पिटल सभागृह मुथा चौक नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते डॉ.हंसराज वैद्य, प्रफुल्ल सावंत, अंकुश सोनसळे, संदीप भालेराव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

मराठवाडा लोकविकास समन्वय संघर्ष समिती ही मागील चार वर्षांपासून नांदेड शहर तसेच संपूर्ण जिल'ात वैयक्तिक, सामाजिक तथा जनहिताचे सार्वजनिक प्रश्न घेऊन अन्याय अत्याचार विरोधी लढ्याच्या कार्यात सक्रिय कार्यशील आहे. मागील चार वर्षात समितीच्या माध्यमातून शहरातील विविध प्रशासकीय स्तरावरील शिक्षण, आरोग्य, शहर व परिसर विकास, महावितरण, ज्येष्ठ नागरिक, कामगार, शेतकरी, कष्टकरी यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठीच्या विविध प्रश्नांवर अग्रेसर राहून कार्य करत आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन समितीचे मुख्य समन्वयक के. के.जांबकर, बंडोपंत कुंटूरकर, विजय जोशी, कमलाकर जोशी, कृष्णा उमरीकर, डी.एम. पाटील, माधवराव कल्याणकर, जगन पांचाळ, राजमल बाकलीवाल, डॉ. मुकुंद पांडे, शिवकांत स्वामी, एच. आर. पेद्देवाद, राजेश माने, रघुनाथ सरदेशपांडे, सुरेश बिंदू, गंगाधर श्रीरामवार, नारायण घोगरे, जी.टी.शिंदे, सखाराम कुलकर्णी, रमेश यन्नावार, आर. बी. दुडके, एस. व्ही. कंठाळे, माणिक डहाळे, दीपक आडगावकर यांनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष श्री.डी.एस.निंबाळकर साहेब २ रे सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.९०२/२०२६

१) शेख हारुन शेख अहेमद, वय ४८ वर्ष व्यवसाय : व्यापार, २) तबासुम बेगम एम.डी.मजारुद्दीन वय - ४६, व्यवसाय : घरकाम रा.चौपाला इतवारा,नांदेड ३) शेख उमर पिता शेख आहेमद, वय - ४३ वर्ष व्यवसाय : व्यापार रा.शिवाजीनगर, नांदेड ४) अंजुम बेगम शेख निसार आहेमद वय - ४१, व्यवसाय : घरकाम रा.दुलेशाह रेहमाननगर,नांदेड, ५) शेख हुसैन शेख आहेमद, वय - ३९ वर्ष व्यवसाय : व्यापार, ६) शेख ईमरान शेख आहेमद, वय ३६ वर्षे, व्यवसाय : व्यापार, ७) शेख अजहर शेख आहेमद वय : ३५ वर्ष व्यवसाय : व्यापार, ८) शेख अजास शेख आहेमद वय : ३४ वर्षे व्यवसाय : व्यापार, ९) हीना बेगम शेख तौफीक वय : ३१ व्यवसाय : घरकाम रा.नामपल्ली हैदराबाद, १०) शेख जुनेद शेख आहेमद वय : २७ वर्षे व्यवसाय : व्यापार वादी क्र.१, ५, ६, ७, ८, १० सर्व रा.समीराबाग वाघी रोड,नांदेड

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत खुर्शीद बेगम भ्र.शेख आहेमद यांचे वारस आहेत. मयत खुर्शीद बेगम भ्र.शेख आहेमद यांचा मृत्यू दिनांक ०४/१०/२०२३ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय इतर कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत:ता न्यायालयात दिनांक १०/८/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ३०/६/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| क. लिपिक | स्वाक्षरित/- |
| २ रे सह दिवाणी न्यायालय | स.अधिक्षक |
| क.स्तर नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

# पीपल्स प्राथमिक शाळेत धूत परिवाराच्यावतीने शालेय पुस्तकांचे वाटप

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स प्राथमिक शाळा, गोकुळनगर नांदेड येथे श्री शंकरलाल जमनालाल धूत परिवाराच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी धूत परिवाराच्या प्रतिनिधींनी शिक्षणासाठी सामाजिक योगदान देणे ही आपली जबाबदारी असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करून उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संदेश दिला.नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांनी धूत परिवाराने राबविलेल्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांची मोठी मदत होत असल्याचे सांगितले. तसेच धूत परिवाराचे मनःपूर्वक आभार मानले. याप्रसंगी संस्थेच्या सचिव प्रा. शामलताई पत्की, शालेय समिती अध्यक्ष स.नौनिहालसिंह जागीरदार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारणी सदस्य एडवोकेट चिरंजीलाल दागडिया, सूत्रसंचालन श्रद्धा सावले व आभार प्राथमिकचे मुख्याध्यापिका सोनाली केंद्रे यांनी मांनले.या कार्यक्रमास प्रसिद्ध उद्योजक शंकरलाल जमनालाल धूत, गणेश लाल धूत, सीए



गोविंद मुंदडा, विद्यार्थी पालक व धूत यांचामित्र परिवार,शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि धूत परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते.

## महिलेची बॅग लंपास

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील डॉक्टरलेन भागात असलेल्या मामीडवार कृषी केंद्रातून एका महिलेची बॅग चोरट्यांनी लंपास केल्याची घटना बुधवारी दुपारी घडली आहे. ताराबाई विरेंद्र आवूलवार (वय ६०) रा.विवेकनगर, नांदेड ह्या मामीडवार कृषी सेवा केंद्रातून खरेदी करीत असतांना अज्ञात चोरट्यांनी त्यांची बॅग लंपास केली. बॅगेत पंधरा हजार रुपये होते. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## टी.सी.हरवली आहे

माझी शेख अबू झैद शेख इस्माईल या नावाची चौथीची टी.सी. चैतन्यनगर ते रेल्वे स्टेशन प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

पत्ता
निलोफर कॉलनी,चैतन्यनगर,
तरोडा (बुद्रुक),नांदेड.
मो.नं.९०६९७०७९७९

# मतदान हा लोकशाहीचा पवित्र हक्क;प्रत्येक पात्र नागरिकाने नाव नोंदवावे-संजय भोसीकर

कंधार/प्रतिनिधी-विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एसआय-आर) कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या मतदार नोंदणी व पडताळणी मोहिमेत प्रत्येक पात्र नागरिकाने सहभागी होऊन आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करावी आणि आवश्यक असल्यास तातडीने नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर यांनी केले.

पानभोसी (ता. कंधार) येथे मतदारांच्या गृहभेटी व मतदार नोंदणी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी त्यांनी बूथस्तरावरील अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला तसेच मतदार नोंदणी प्रक्रिया पारदर्शक व नियमांनुसार राबविण्याबाबत सूचना केल्या. भोसीकर म्हणाले, मतदान हा



प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार असून लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे आवश्यक आहे. कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.या पाहणीवेळी बीएलओ मारोती केंद्रे, मल्लिकार्जुन मरशिवणे, शंकर लांडगे, पोलिस पाटील शेख इसाक, बीएलओ शेख साबुद्दीन पटेल, मनोहर भोसीकर, सारनाथ जोंधळे, ईश्वर जोंधळे, ईश्वर लुंगारे तसेच गावातील अनेक मतदार उपस्थित होते.

# इस्लापूर पोलीसांनी ५४ हजाराचा अवैध गुटखा केला जप्त



नांदेड/प्रतिनिधी-दुचाकीवर शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा विक्रीसाठी घेवून जात असतांना शुक्रवारी हुंडी ते तोंडबा नाल्या जवळ पकडला असून याप्रकरणी एका जणास अटक करण्यात आली आहे.

दुचाकीवर एक तरुण गुटखा विक्रीसाठी घेवून जात असल्याची माहिती इस्लापूर पोलीसांना मिळाली. सहाय्यक पोलीस निरिक्षक आर.बी.जाधवर, फौजदार श्रीमती कागणे व पोलीस कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी दुपारी हुंडी ते तोंडबा रोडवर रॉयल इनफिल्ड मोटरसायकल क्र.एमएच २६-डीबी-१३७४ पकडली. दुचाकीस्वार दीपक गणेश आलडवाड (वय ३०) रा.किनवट यास ताब्यात घेवून त्याच्या जवळील पोत्याची तपासणी केली असता त्यामध्ये शासनाने बंदी घातलेल्या विविध कंपनीचा ५४ हजाराचा गुटखा आढळून आला. पोलीसांनी गुटखा व दुचाकी असा १ लाख ३४ हजाराचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी इस्लापूर पोलीस ठाण्यात दीपक आलडवाड याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊंच्या स्मारकाचे तात्काळ सुशोभीकरण करा

## शिवभक्तांचे पालिका मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

कंधार/प्रतिनिधी-कंधार शहरातील विजयगड येथील राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या स्मारकाचा स्वतंत्र ठराव पारीत करुन सुशोभीकरणाचे काम तात्काळ सुरु करण्याची मागणी शिवभक्तांच्या वतीने शुक्रवारी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

माजी खासदार व आमदार भाई केशवराव धोंडगे यांनी राष्ट्रमाता जिजाऊंच्या स्मारकाची स्थापना केली आहे. या स्मारकास अंदाजे ३० ते ३५ वर्षे झाले आहेत. प्रत्येक निवडणुकीमध्ये सर्व पक्षाचे पुढारी या स्मारकाच्या सुशोभीकरणाचा वचननामा देऊन जनतेला फसवण्याचे काम करत आहेत. नगरपालिकेच्या बैठकीत पुढच्या बैठकीत घेऊ असे म्हणुन बगल दिली जात आहे. तसेच या विषया सोबत दुसरे विषय लावून जिजाऊ स्मारकाचे राजकारण केले जात आहे. यामुळे आपल्या देशाची व राज्याची अस्मिता असलेल्या राष्ट्रमाता जिजाऊंच्या स्मारकाच्या सुशोभीकरणासाठी दिरंगाई केली जात आहे. यामुळे शिवभक्तांमध्ये तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे. याप्रकरणी दि.१० जुलैच्या आत दखल घेऊन स्वतंत्र बैठक लावून ठराव पारित करुन सुशोभीकरणाचे काम तात्काळ सुरू करावे, अन्यथा शिवभक्तांच्या वतीने नगरपालिका कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही मुख्याधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर परमेश्वर जाधव, संभाजी लाडेकर, नितीन कोकाटे, धनराज कौसल्ये, विशाल कौसल्ये, संतोष बोरुळे, बालाजी काचमांडे, नारायण वरपडे, सचिन लाडेकर, संतोष सोमासे, माणिक बटलवाड यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सालेगाव येथे जिल्हाधिकाऱ्यांकडून एसआयआर कामाची पाहणी



नांदेड/प्रतिनिधी-विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत मतदारांचे गणना पत्रक भरून घेण्याची कार्यवाही जिल्ह्यात सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज धर्माबाद तालुक्यातील मौजे सालेगाव येथे भेट देऊन विशेष सखोल पुनरीक्षण अभियानाच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी गावात सुरू असलेल्या मतदार गणना पत्रक भरण्याच्या प्रक्रियेची प्रत्यक्ष पाहणी करून कामकाजाची माहिती घेतली.तसेच बीएलओंकडून सुरू असलेल्या सर्वेक्षण व गणना पत्रक भरण्याच्या कामाची गुणवत्ता, अचूकता आणि गती याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या.

# संततधार पावसाने जनजीवन विस्कळीत; बळीराजा सुखावला

## देगलूर तालुक्यात खरीप हंगामाच्या पेरणीला वेग

देगलूर/प्रतिनिधी-आर्द्रा नक्षत्राच्या उत्तरार्धात खोळंबलेला मान्सून दि.२ जुलैपासून देगलूर तालुक्यात पाऊस बरसण्यास प्रारंभ झाला आहे. पावसाचा जोर कमी असला तरी संततधारेमुळे खरीप हंगामातील पेरणीला वेग आला आहे. पाऊस तालुक्यात सर्वदूर कोसळत आहे.

देगलूर तालुक्यात शुक्रवारी सकाळपासूनच सुरू झालेल्या मुसळधार पावसाने ३ जुलै रोजी दिवसभर हजेरी लावली. सततच्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून नागरिक, विद्यार्थी, नोकरदारांना दैनंदिन कामकाजासाठी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. सायंकाळी उशिरापर्यंत पावसाची रिपरिप सुरूच होती. देगलूर शहरात सकल भागामध्ये पाणी साचले असून अंतर्गत रस्त्यावर वाहतुकीचा काहीसा वेग मंदावला आहे. अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचल्यामुळे वाहन चालकांना कसरत करावी लागत आहे. ग्रामीण भागात वाहतुकीला अडचण निर्माण होत आहे.पावसामुळे विद्यार्थ्यांनी शाळांना दांडी मारली असून बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ कमी झाली आहे. पावसामुळे अनेक लहान व्यवसायिकांच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. शुक्रवारी दुपारी दोन नंतर अनेक शासकीय कार्यालयात शुकशुकाट दिसून आला. कर्मचारी आणि बाहेरगावाहून ये-जा करणाऱ्यांनी आटोपते घेत कार्यालयातून काढता पाय घेतला. आज शनिवार आठवडी बाजार सुद्धा चालू असताना पाणी चालू असल्यामुळे आठवडी बाजाराला सुद्धा या पावसाचा फटका बसला आहे. शनिवार आणि रविवार सुट्टी असल्याने नागरिकांनी गाव जवळ केले. अनेक दिवसानंतर पाऊस आल्याने शेतकरी वर्ग समाधानी दिसून येत आहे. हा पाऊस खरिपासाठी संजीवनी ठरणार आहे. खरीप हंगामाच्या पेरणीला वेग आला आहे. गावोगावी ट्रॅक्टरने पेरणीची कामे केली जात आहेत. तीन दिवसात जवळपास ६० टक्के पेरणी पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले. आणखी दोन दिवस असाच पाऊस बरसण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

# लेंडी प्रकल्पातील घळभरणीच्या निकृष्ट कामाच्या चौकशीसाठी ठाकरे सेनेचे 'हलकी बजाओ' आंदोलन



देगलूर/प्रतिनिधी-लेंडी प्रकल्पातील घळभरणीच्या कामामध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने या प्रकल्पाच्या कामाची चौकशी करून अधिकाऱ्यांवर व सुजाता कन्स्ट्रक्शन कंपनीवर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी भक्तापुर रोडवरील लेंडी प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता यांच्या प्रवेश दारावर शुक्रवारी निदर्शने करून हलकी बजाओ आंदोलन करण्यात आले.

मुखेड तालुक्यातील बहुप्रतिक्षित महाराष्ट्र,तेलंगणा राज्यातील शेतकऱ्यांना वरदान असलेल्या लेंडी प्रकल्पाचे घळभरणीचे काम चालू असुन या कामात अधिकाऱ्यांना हाताशी धरून निकृष्ट दर्जाचे माती, मुरुम, रेती आदी साहित्य वापरून काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत आहे. वापरण्यात येणारे साहित्य धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून खोदकाम करून साहित्य वापरण्यात येत आहे. त्यामुळे या कामाची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर व सुजाता कन्स्ट्रक्शन कंपनीवर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी भक्तापुर रोडवरील लेंडी प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता प्रणव मुदगल यांच्या प्रवेश दारावर निदर्शने करुन हलकी बजाओ आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, पांडुरंग पाटील थडके, भगवान जाधव, भागवत पाटील सोमुरकर, विनोद सोनकांबळे, संतोष कांबळे, मण्णाजी पैलावार, हाणमंत राजुरे लख्खेकर, शिवाजी सोनकांबळे मुजळगेकर आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थितीत होते.

# एसआयआर अंतर्गत प्रत्येक घराची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची मागणी

माहूर/प्रतिनिधी-मतदार यादीच्या विशेष गहन पुनरिक्षण मोहिमेदरम्यान बूथ लेव्हल अधिकारी यांनी प्रत्येक घराला प्रत्यक्ष भेट देऊन मतदारांची माहिती अचूकपणे नोंदवावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे शहर युवक कार्याध्यक्ष आशु पठाण यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगर पंचायतचे मुख्याधिकारी यांना निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की, सध्या सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष गहन पुनरिक्षण मोहिमेदरम्यान प्रक्रियेत काही ठिकाणी बूथ लेव्हल अधिकारी हे प्रत्यक्ष घरभेट न देता किंवा अपुरी पडताळणी करून माहिती संकलित केल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे मतदार यादीत त्रुटी राहण्याची तसेच पात्र मतदारांची माहिती चुकीची नोंद होण्याची शक्यता निर्माण होत आहे. यामुळे संबंधित सर्व बूथ लेव्हल अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घराला प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांची माहिती पडताळून घ्यावी. आवश्यक कागदपत्रांची तपासणी करूनच फॉर्ममध्ये अचूक माहिती भरावी, जेणेकरून भविष्यात कोणत्याही नागरिकाला मतदार यादी संदर्भात अडचणींना सामोरे जावे लागू नये, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या संदर्भात मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित अधिकारी व बूथ लेव्हल अधिकारी यांना आवश्यक सूचना देऊन प्रत्येक घराची प्रत्यक्ष पडताळणी करूनच माहिती संकलित करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंती आशु पठाण यांनी केली आहे.

# हणेगावातील एचपी गॅस ग्राहकांची आर्थिक पिळवणूक?

## नॉझल बसविण्यासाठी अवाजवी बिल आकारल्याची ग्राहकांची तक्रार

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील हाणेगाव येथील व परिसरातील एचपी गॅस ग्राहकांकडून मोळा (नॉझल/नट) बसविण्याच्या नावाखाली अवाजवी शुल्क आकारले जात असल्याची गंभीर तक्रार पुढे आली असून, त्यामुळे ग्राहकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. सेवा देण्यासाठी येणाऱ्या मेकॅनिककडून प्रवाससाठी झालेला पेट्रोल खर्चही ग्राहकांकडूनच वसूल केला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित मेकॅनिककडे एवढे शुल्क का आकारले जाते, अशी विचारणा केल्यास, मी उदगीरहून येतो, माझा पेट्रोल खर्च होतो, असे उत्तर दिले जाते. मात्र, कर्मचाऱ्याचा प्रवासखर्च प्रत्येक ग्राहकाकडून स्वतंत्रपणे वसूल करणे कितपत योग्य आहे, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. एका कर्मचाऱ्याचा प्रवासखर्च अनेक ग्राहकांकडून आकारला जात असेल, तर तो ग्राहकांवरील अन्याय असल्याची भावना व्यक्त होत आहे. याशिवाय, मेकॅनिकला वारंवार संपर्क करूनही सेवा मिळण्यासाठी सहा ते सात दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याची तक्रारही अनेक ग्राहकांनी केली आहे. काही मिनिटांत पूर्ण होणाऱ्या साध्या कामासाठी अवाजवी शुल्क आकारले जात असल्याने हे ग्राहक सेवेच्या नावाखाली आर्थिक पिळवणूक तर नाही ना, अशी चर्चा परिसरात सुरू आहे.सेवा शुल्काचे अधिकृत दर काय आहेत, त्याची माहिती ग्राहकांना स्पष्टपणे का दिली जात नाही, तसेच प्रत्यक्षात अधिकृत दरानुसारच शुल्क आकारले जाते का, याबाबतही पारदर्शकतेचा अभाव असल्याची भावना ग्राहकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित एचपी गॅस एजन्सीच्या व्यवस्थापनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून सेवा व्यवस्थेत तातडीने सुधारणा करावी, ग्राहकांना वेळेत व वाजवी दरात सेवा उपलब्ध करून द्यावी, तसेच वारंवार तक्रारी येत असल्याने संबंधित मेकॅनिकची बदली करून दुसरा मेकॅनिक नियुक्त करावा, अशी ठाम मागणी ग्राहकांनी केली आहे.

# आदिवासी मुलींच्या शैक्षणिक संकुलात आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

मांडवी/प्रतिनिधी-पिंपळगाव (फाटा) येथील आदिवासी मुलींच्या शासकीय शैक्षणिक संकुलात नुकतीच विद्यार्थिनींसाठी विशेष आरोग्य तपासणी व समुपदेशन शिबिराचे अत्यंत यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करण्यात आले. या विशेष कार्यक्रमाला आरोग्य विभागाचे डॉ.ए.एम. ओव्हळ आणि सौ.डी.एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

शिबिरादरम्यान उपस्थित आरोग्य तज्ज्ञांनी संकुलातील विद्यार्थिनींची शारीरिक आरोग्य तपासणी केली. केवळ तपासणी न करता, आरोग्य अधिकाऱ्यांनी मुलींशी संवाद साधत त्यांना अत्यंत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने वाढते वय आणि बदलवयात येताना शरीरात होणारे नैसर्गिक बदल आणि त्याकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन, संतुलित आहार वाढत्या वयातील मुलींसाठी आवश्यक असलेले पोषण आणि आहाराचे महत्त्व, वैयक्तिक स्वच्छता दैनंदिन जीवनात पाळावयाची स्वच्छता आणि आरोग्याची काळजी, या विषयांवर तज्ज्ञांनी सविस्तर चर्चा करून विद्यार्थिनींना जागरूक केले. तसेच, मुलींच्या मनात असलेल्या आरोग्याविषयीच्या विविध शंकांचे निरसन करण्यासाठी विशेष समुपदेशन करण्यात आले. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे प्रतिनिधी श्री. राम चेबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती व्ही. आर. म्यानमवार यांच्यासह शाळेचे शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

पान १ वरुन

**नांदेड जिल्हा...**

तत्पर राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. या डेमो प्रकल्प उभारणे, चॉकी व नर्सरी विकासाला चालना देणे, शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि गावभेटी दरम्यान रेशीम उत्पादक शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधणे आणि रेशीम शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी पुढील काळात माझा मुक्काम रेशीम शेतकरी यांच्या घरी करणे अशा विविध उपक्रमांवर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या पेरणीचे दिवस असून पाऊस सुरू असून सुद्धा ४०० ते ४५० शेतकरी उपस्थित असल्या बद्दल जिल्हाधिकारी यांनी सर्वांचे आभार मानले.


CHANGE IN MY NAME

My Old Name IS :- **MOHAMMAD YASIN**
New Name IS :- **MOHAMMAD YASIN MOHAMMAD JI**
Old Father Name IS :- **MOHAMMED SHAFI**
NEW Father Name IS :- **MOHAMMEDJI**
Old Date Of Birth :- 04-07-1942
NEW Date Of Birth :- 01-01-1943
Hence forth my all correspondance with Be done as per my new name. Please Consider the same.
Contract
Address :- 2-5-131, Khadakpura,
Nanded Dist Nanded.431601
Contact no :- 9975887658


# मोतीराम सूर्यवंशी यांचे निधन

कंधार/प्रतिनिधी-मोतीराम निवृत्ती सूर्यवंशी सेवानिवृत्त गँगमॅन रा.पोखरभोसी ता. कंधार यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार दि.३ जुलै रोजी रात्री निधन झाले आहे.

त्यांच्या पश्चात तिनं मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. ते संत गाडगेबाबा माध्यमिक विद्यालय सोमठाणा शाळेचे कर्मचारी शेषराव मोतीराम सूर्यवंशी व डॉ. संजय मोतीराम सूर्यवंशी आणि राजीव मोतीराम सूर्यवंशी यांचे वडील होत.त्यांच्यावर दि.४ जुलै रोजी दुपारी हिंदू स्मशानभूमी कंधार येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# पांडुरंग चौदंते यांचे निधन

मुदखेड/प्रतिनिधी-ज्येष्ठ नागरिक व महावितरणचे सेवानिवृत्त कर्मचारी पांडुरंग माणिकराव चौदंते (वय ७४) रा.भीमनगर यांचे शुक्रवार दि.३ जुलै रोजी सायंकाळी दुःखद निधन झाले.

ते अत्यंत मनमिळावू आणि प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व म्हणून परिसरात परिचित होते. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी सकाळी ११ वाजता बौद्ध स्मशानभूमी, भीमनगर मुदखेड येथे अंत्यविधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुलं, दोन मुली, नातवंड असा मोठा परिवार आहे.

पान १ वरुन

**कै.सौ.कुसुमताई चव्हाण स्मृती...**

नागनाथ फटाले, शैलाताई लोहिया, क्रिकेटपटू संजय बांगर, अभिनेता मकरंद अनासपुरे, ज्येष्ठ संपादक महावीर जोंधळे, नाट्य दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, डॉ. विठ्ठल लहाने, सकाळ समूहाचे संपादक डॉ निलेश खरे, नाट्य व चित्रपट दिग्दर्शक वामन केंद्रे, अभिनेत्री प्रतीक्षा लोणकर, सनदी अधिकारी राध्येश्याम मोपलवार, डॉ.विपिन इटणकर आदींचा समावेश आहे. पुरस्कार वितरण सोहळा जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४